<u>प्रेस नोट</u>

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ११.११.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | कु.करिश्मा सतिशराव वैदय, वय २७ वर्षे, पद — मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय,. भातकुली, रा.मालविय गार्डन जवळ मोर्शी, जि.अमरावती, वर्ग — २. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ११/११/२०२२ चे १०.०० ते १०.१४ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ५०,०००/— रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | २०,०००/— |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | २०,०००/— रुपये |
| ७ | घटनास्थळ | आलोसे राहत असलेल्या भाडयाचे घरी न्यु महालक्ष्मी नगर, अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ३१/१०/२०२२ रोजी लेखी तक्रार दिली की, नगरपंचायत भातकुली येथील मुख्याधिकारी कु.करिश्मा वैदय यांनी तक्रारदार यांना भातकुली येथील दुकानामध्ये शिलाई मशीन प्रशीक्षण व गारमेंटसचा व्यवसाय सुरु करणेकरीता ना—हरकत प्रमाणपत्र देणेकरीता ५०,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.०२/११/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान नगरपंचायत भातकुली येथील मुख्याधिकारी कु.करिश्मा वैदय यांनी तक्रारदार यांना भातकुली येथील दुकानामध्ये शिलाई मशीन प्रशीक्षण व गारमेंटसचा व्यवसाय सुरु करणेकरीता ना—हरकत प्रमाणपत्र देणेकरीता ५०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी २०,०००/— रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक १०/११/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान यातील आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांचे घरी पैसे घेवून येण्याचे सांगीतले. वरुन आज दिनांक ११/११/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे कु.करिश्मा वैदय यांनी २०,०००/— रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आरोपींला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. खोलापुरी गेट, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती, श्री.एस.एस. भगत, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली, पो.नि.प्रविणकुमार पाटिल, पो.नि.केतन मांजरे, मपोहवा.माधुरी साबळे, पो.ना.विनोद कुंजाम, पो.ना.युवराज राठोड, पो.ना.राहूल वंजारी, चापोना.गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१
टोल फ्रि नंबर — १०६४

(प्रविणकुमार पाटिल)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.न.९८५००७०५०४